पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

मुंबई

● वर्ष १ ●अंक 56 ●बुधवार, दि. २९ जुलै २०२६ ● मूल्य 3 ● पृष्ठे 4

RNI No.- MHAR/ 26 /A4530 Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 Web. https://epaper.citynewssuperfast.com

**सुविचार**

" विचार सकारात्मक असतील तर आयुष्यातील प्रत्येक कठीण प्रसंग सोपा वाटू लागतो."




## »थोडक्यात

### जेन जींचा पुढचा प्लॅन काय ?

नवीदिल्ली : कॉकरोच जनता पार्टी आणि भारतीय किसान युनियन यांच्यातील राजकीय हालचालींना वेग आला आहे. ण्व्झ् चे राष्ट्रीय प्रवक्ते आशुतोष रांका आणि पक्षातील इतर नेत्यांनी दिल्लीमध्ये भारतीय किसान युनियनचे ज्येष्ठ नेते राकेश टिकैत यांची भेट घेतली. या बैठकीत शेतकरी, विद्यार्थी आणि युवकांना एकत्र आणून पुढील आंदोलनाची दिशा ठरवण्याबाबत चर्चा करण्यात आली.

---

### 'इडियट' शब्दावरुन सभागृहात गोंधळ

नवी दिल्ली : 'देशातील तरुण रस्त्यावर उतरले. अगदी भाजपमधील लोकांनीही आपल्या स्वतःच्या मुलांना जाऊन विचारावे की नक्की काय चुकले. या आंदोलनांमध्ये कोणताही राग किंवा द्वेष नव्हता; ते केवळ आपला आवाज उठवत होते.' अशी विचारणा खा.राहूल गांधी यांनी संसदेत केली. यावेळी त्यांनी आपल्या भाषणात त्यांनी 'इडियट' (मूर्ख) हा शब्द वापरला. यामुळे सत्ताधारी पक्षाने तीव्र गदारोळ केला. किरेन रिजिजू यांनी त्यांना मध्येच थांबवले, तेव्हा राहूल गांधी म्हणाले, 'तुम्हाला या देशात केवळ भाजपनेच बोलावे असे वाटत असेल, तर मी शांतपणे खाली बसतो.'अध्यक्ष बिर्ला यांनी राहुल गांधींनी वापरलेला 'मूर्ख' हा शब्द असंसदीय घोषित केला असून, तो सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकण्याचे आदेश दिले आहेत.

---

### कर्नाटकात एड्सचा हाहाकार...!

बंगळूर : नॅशनल एड्स कंट्रोल ऑर्गनायझेशनच्या अहवालानुसार, एचआयव्ही बाधित रुग्णांच्या संख्येत कर्नाटक संपूर्ण देशात तिसऱ्या स्थानावर आहे.

आरोग्य विभागासाठी ही २०२३-२४ मध्ये या वयोगटातील बाधितांची संख्या ४४,५०० होती, ती २०२५-२६ मध्ये वाढून तब्बल ६६,६०० वर पोहोचली आहे. अवघ्या दोन वर्षांत यात मोठी वाढ झाली आहे.

---

### वांद्रे-वर्सोवा सागरी सेतूसाठी नवा जोडरस्ता

# 1,722 कोटींच्या प्रकल्पास राज्य सरकारची मंजुरी

प्रतिनिधी २९ जुलै



**मुंबई :** नवीन रस्त्यावरून ताशी सुमारे ३,५०० प्रवासी गाड्यांची वाहतूक होण्याची अपेक्षा आहे. यामुळे वरळी ते फोर्ट प्रवासाचा वेळ गर्दीच्या वेळी ४५ मिनिटांवरून सुमारे ५-१० मिनिटांपर्यंत कमी होईल, तर फोर्ट ते वर्सोवा प्रवासाचा वेळ एका तासावरून सुमारे १५-२० मिनिटांपर्यंत कमी होईल.

वांद्रे-वर्सोवा सागरी सेतू वांद्रे किल्ला परिसराशी जोडण्यासाठी अतिरिक्त जोडरस्त्याला राज्य सरकारने हिरवा कंदील दाखवला आहे. वांद्रे किल्ला परिसरातून सागरी सेतूकडे जाणाऱ्या ३.५५ किलोमीटर लांबीच्या या जोडरस्त्याच्या बांधकामासाठी एकूण १,७२२.४० कोटी रुपयांच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने याबाबतचा शासन निर्णय जारी केला असून, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत हा प्रकल्प राबविण्यात येणार आहे.


वांद्रे पश्चिमेतील पाली हिल, बँडस्टँड आणि वांद्रे किल्ला परिसरात गेल्या काही वर्षांत वाहतुकीचा ताण मोठ्या प्रमाणात वाढला आहे. पर्यटनस्थळे, किनारी भागातील वाढती वर्दळ, पुनर्विकास प्रकल्प तसेच पंचतारांकित हॉटेलांमुळे या भागात अतिमहत्त्वाच्या व्यक्तींचीही वारंवार ये-जा असते.

त्यामुळे स्थानिक वाहतूक व्यवस्थेवर अतिरिक्त ताण पडत असून, सागरी सेतूकडे जाण्यासाठी पर्यायी आणि जलद मार्गाची गरज व्यक्त होत होती. या पार्श्वभूमीवर वांद्रे किल्ला परिसरातून थेट सागरी सेतूशी संपर्क साधणारा हा जोडरस्ता महत्त्वाचा ठरणार आहे. या जोडरस्त्याच्या प्रत्यक्ष बांधकामासाठी १,१८३.७९ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. जीएसटी, सल्लागार शुल्क, देखभाल, पर्यवेक्षण, प्रशासकीय आणि इतर अनुषंगिक खर्चांचा समावेश केल्यानंतर प्रकल्पाचा एकूण खर्च १,७२२.४० कोटी रुपयांवर जाणार आहे. या कामासाठी आवश्यक निधी राज्य सरकारकडून उपलब्ध करून दिला जाणार असून, प्रचलित नियमांनुसार निविदा प्रक्रिया राबविली जाणार आहे. सध्या ९.८ किलोमीटर लांबीच्या स्वातंत्र्यवीर सावरकर सागरी सेतूचे काम प्रगतिपथावर आहे. या प्रकल्पात वांद्रे, कार्टर रोड, जुहू आणि वर्सोवा येथील जोडरस्त्यांचा समावेश आहे. नव्या जोडरस्त्यामुळे वांद्रे किल्ला, पाली हिल आणि बँडस्टँड परिसरातून सागरी सेतूपर्यंतचा प्रवास अधिक वेगवान होईल. तसेच पश्चिम उपनगरांतील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा या उपक्रमाच्या माध्यमातून पूर्ण होईल, असा सरकारचा मानस आहे. आठ हजार झाडे तोडण्यास मंजुरी राज्य सरकारकडून राबवण्यात येणाऱ्या धारावी पुनर्विकास प्रकल्पात आठ हजार झाडांची कत्तल होणार आहे.

---

# अकोल्यात बोगस बियाण्यांचा महाघोटाळा!

प्रवीण वानखडे । २९ जुलै




अकोला : खरीप हंगामात लाखो हेक्टरवर पेरणी केलेल्या शेतकऱ्यांच्या पाठीत बोगस बियाणे आणि खत उत्पादकांनी थेट खंजीर उपसला आहे. शेतात पेरलेले सोयाबीन उगवलेच नसल्याने अकोला जिल्ह्यात संतापाचा उद्रेक झाला असून, कृषी विभागाकडे सुमारे १० हजार तक्रारींचा डोंगर साचला आहे. या प्रकरणी कृषी विभागाने आक्रमक पवित्रा घेत धाडसत्र सुरू केले असून, १२ नामवंत बियाणे कंपन्यांवर तब्बल १४ एफआयआर दाखल केले आहेत. या व्यतिरिक्त शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या सर्वांवर गुन्हे दाखल करण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

बोगस बियाण्यामुळे खरिप हंगामात हजारो हेक्टरची शेती पडीक राहिली त्यामुळे शेतकऱ्यांचे तर नुकसान झाले पण, त्याच बरोबर देशाचे देखील नुकसान झाले. यास जबाबदार प्रत्येक घटकावर कारवाईची मागणी होत आहे. कंपन्यांवर गुन्हे दाखल झाले तरी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना प्रति एकर योग्य भरपाई आणि दुबार पेरणीचा खर्च तात्काळ मिळायलाच हवा, अशी जोरदार मागणी शेतकरी संघटनांनी लावून धरली आहे. बोगस बियाणे विकणाऱ्या कंपन्यांना काळ्या यादीत टाकून त्यांच्या मालकांना बेड्या ठोकण्याची मागणी आता संपूर्ण अकोला जिल्ह्यात जोर धरत आहे.

**39** लाखांचा बियाणे साठा जप्त

**12** कंपन्यांवर 14 FIR दाखल

**10** हजार शेतकऱ्यांची फसवणूक

**१० हजार तक्रारींचा पर्दाफाश !**

पेरणीनंतर सोयाबीनचे बियाणे मातीतच कुजल्याने हजारो बळीराजांवर दुबार पेरणीचे संकट ओढवले आहे. कृषी विभागाने प्राप्त १०,००४ तक्रारींमधील बियाण्यांचे नमुने बीज परीक्षण प्रयोगशाळा, अकोला येथे तातडीने तपासणीसाठी पाठवले असून, अनेक नमुने निकृष्ट (फेल) आढळल्याचा धक्कादायक खुलासा झाला आहे.

## भरारी पथकाची धडक कारवाई ३९ लाखांचा मुद्देमाल जप्त

कृषी विभागाच्या विशेष भरारी पथकाने जिल्ह्यात ठिकठिकाणी छापे टाकून अवैध साठवणूकदारांचे धाबे दणाणले आहेत. अनधिकृतपणे साठवून ठेवलेल्या खतांचा १९ लाख रुपयांचा साठा जप्त करण्यात आला. एमआयडीसी परिसरात विनापरवाना साठवून ठेवलेली कापूस व मका बियाण्यांची पाकिटे जप्त करण्यात आली, ज्याची बाजारपेठेतील किंमत २० लाख रुपये आहे. 'या' १२ नामांकित बियाणे कंपन्यांवर गुन्हे दाखल!शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या आणि '१००टक्के हमी'चे खोटे दावे करून निकृष्ट बियाणे विकणाऱ्या कंपन्यांवर 'अत्यावश्यक वस्तू कायदा' आणि 'बियाणे कायद्या'नुसार गुन्हे नोंदवण्यात आले आहेत:रवी सीड्स, बूस्टर सीड्स,ईगल सीड्स,ओसवाल सीड्स,विगर सीड्स,दफ्तरी सीड्स,ग्रीन गोल्ड सीड्स,ऑस्कर सीड्स,बाफना सीड्स,इनोवेज सीड्स (यांच्यासह एकूण १२ कंपन्यांवर एफआयआर दाखल)वर गुन्हे दाखल झाले आहे.

---

# 'रि' नीटचाही पेपर फुटला ?

## आमदार रोहित पवारांचा खळबळजनक आरोप

प्रतिनिधी २९ जुलै



**मुंबई :** देशात सध्या पेपरफुटीचे सत्र थांबण्याचे नाव घेत नसून, यातच आता आमदार रोहित पवार यांनी 'नीट' परीक्षेबाबत एक अत्यंत खळबळजनक आरोप केला आहे. 'नीट'चा पेपर फुटल्यानंतर जी फेरपरीक्षा घेण्यात आली होती, तिचा पेपरही परीक्षेच्या तीन दिवस आधीच गुजरातमध्ये फुटल्याचा दावा पवार यांनी एका ट्विटद्वारे केला आहे.

जर ही गोष्ट खरोखरच सत्य असेल, तर विद्यार्थ्यांच्या भवितव्याच्या दृष्टीने ही अत्यंत चिंताजनक आणि गंभीर बाब असल्याचेही त्यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे. रोहित पवार यांनी ट्विट करत म्हटले की, नीट पेपर लीक झाल्यानंतर जी नवीन फेरपरीक्षा घेण्यात आली त्या परीक्षेचा पेपर देखील ३ दिवस आधीच गुजरातमधून फुटल्याच्या बातम्या समोर येत आहेत. हे सत्य असेल तर खूप अवघड आहे. तपास यंत्रणांनी या संदर्भात त्वरित खुलासा करावा आणि पेपर फुटला असेल तर कुठल्याही दबावाला बळी न पडता यामागील रॅकेट उघडकीस आणावे, अशी विनंती पवारांनी केली आहे. तसेच त्यांनी यासोबत पेपरफुटी संदर्भात पुढे आलेले स्क्रीन शॉट, मेल, संभाषण या सगळ्याची एक लिंक देखील त्यांनी ट्विट केली आहे.

आमदार रोहित पवार यांनी आपल्या दाव्याच्या पुष्ट्यर्थ काही कागदपत्रे आणि एक ईमेल ट्विट करत, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. देशात आधीच 'नीट' परीक्षेतील गैरव्यवहारांवरून मोठे रणकंदन माजले असून, यावरून केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्यावर राजीनाम्याची वेळ ओढवली आहे.

---

# बनावट दारु उत्पादकांना वाचविण्यासाठी एक्साईज डिपार्टमेंटने सुरु केला पत्रांचा खेळ

प्रतिनिधी २९ जुलै


संग्रहीत फोटो

**अकोला:** एखाद्या लग्नात बँड, बाजा, बारात, वऱ्हाडी आणि हो नवरदेव नवरी असे सर्वच असतात. जर लग्नात नवरदेवच नसेल तर ते लग्न होणार नाही. असे काही झाले आहे एक्साईज डिपार्टमेंटचे. त्यांच्या बनावट दारु कारखान्याच्या धाडीत सर्व काही सापडले पण, आरोपी फॅक्टरी मालक,शेतमालक मात्र विभागाला माहित नाहीत. लोकांच्या जीवाशी उघडपणे खेळणाऱ्या बनावट दारू निर्मितीच्या कारखान्यावर पडदा पडला असला, तरी आता राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या संशयास्पद भूमिकेवर तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. सातरगाव येथे उघडकीस आलेल्या या अवैध धंद्याप्रकरणी विभागाकडून केवळ औपचारिक पत्रव्यवहार आणि देखावा केला जात असून, मुख्य सूत्रधारांना वाचवण्याचा प्रयत्न तर होत नाही ना? असा जळजळीत सवाल आता नागरिक विचारत आहेत. एका निर्जन ठिकाणी भल्यामोठ्या टाक्या, अत्याधुनिक बॉटलिंग मशिनरी आणि दारूच्या हजारो बाटल्या एका दिवसात अचानक कशा येऊ शकतात ? .ज्याच्या जागेत किंवा शेतात हा 'मौत का कुआँ' सुरू होता, त्या शेतमालकावर तात्काळ आणि थेट गुन्हा का दाखल करण्यात आला नाही ? त्याला केवळ 'शोध पत्र' पाठवून खात्याने काय साध्य केले ? जप्तीचा बनावट देखावा करून मुख्य मालकाला आणि सूत्रधारांना पळून जाण्यासाठी पुरेसा वेळ आणि संधी दिली गेली का, अशी शंका व्यक्त केली जात आहे. कारखान्यात लागणारे स्प्रिट, बनावट लेबल्स, आणि सीलिंग मटेरियल पुरवणारी एक भली मोठी साखळी यामागे कार्यरत आहे. परंतु, भरारी पथकाने या मुख्य साखळीला हात लावण्याचे धाडस दाखवलेले नाही. या विषारी अन् बनावट दारूच्या कारखान्याला कोणाचा राजकीय व प्रशासकीय आशीर्वाद होता ?, राज्य उत्पादन शुल्क विभाग मुख्य सूत्रधाराचे नाव का लपवत आहे अशी विचारणा होत आहे.

---




# पंकज देशमुख यांच्याकडून गायत्री प्राथमिक मराठी शाळेला स्कूल बस भेट!

प्रतिनिधी २९ जुलै

**अकोला:** समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ द्वारे संचालित मां गायत्री प्राथमिक मराठी शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालयातील शिक्षक आणि विद्यार्थ्यांसाठी गुरू पौर्णिमा पर्व अत्यंत आनंददायी ठरले. संस्थेचे सचिव पंकज देशमुख यांच्या कडून विद्यार्थ्यांच्या व्यापक हितासाठी बस भेट देण्यात आली. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन तसेच खाऊचे वाटप करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंकज देशमुख होते.

प्रमुख पाहुणे म्हणून सिद्धेश्वर देशमुख होते. सुरूवातीला प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. मुख्याध्यापक संदीप वाघ,



मुख्याध्यापक सुनील चव्हाण, शाळेतील शिक्षक रामेश्वर बुंदेले, चंदा रोकडे मॅडम, वर्षा हिवराळे मॅडम, मिना काटे मॅडम, कल्पना सोळंके मॅडम, वैशाली गवई मॅडम, कीर्ती पोके मॅडम, आरती देशमुख, शिक्षकेतर कर्मचारी चंद्रजित देशमुख, योगेश लंगोटे, रणजित ठाकूर, शालिनीताई मोरे उपस्थित होते.

---

# शोले स्टाईल आंदोलन!

## पाण्याच्या टाकीवर चढून पेपरफुटीचा तीव्र निषेध



प्रतिनिधी २९ जुलै

**अकोला:** महाराष्ट्रातील MPSC, NEET आणि विविध भरती परीक्षांमध्ये सातत्याने होणाऱ्या कथित पेपरफुटीमुळे लाखो स्पर्धा परीक्षा परीक्षार्थी आणि विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ केला जात आहे. महायुती सरकारच्या या भोंगळ कारभाराचा आणि निष्काळजीपणाचा तीव्र निषेध नोंदवण्यासाठी आज अकोल्यात युवक काँग्रेसच्या वतीने अत्यंत आक्रमक आणि प्रतीकात्मक 'शोले स्टाईल' आंदोलन करण्यात आले.अकोल्यातील ट्युशन एरिया असलेल्या प्रभात किड्स स्कूलसमोरील तसेच अकोला अर्बन बँकेच्या मुख्य शाखेसमोरील पाण्याच्या टाकीवर युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी थेट चढून सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. अकोल्यातील मध्यवर्ती शैक्षणिक हब समजल्या जाणाऱ्या प्रभात किड्स आणि अकोला अर्बन बँकेच्या मुख्य शाखे शेजारील पाण्याच्या टाकीवर कार्यकर्ते चढताच परिसरात एकच खळबळ उडाली. कार्यकर्त्यांनी टाकीवरूनच बॅनर दाखवत आणि घोषणा देत संपूर्ण परिसर दुमदुमून टाकला. घटनास्थळी माहिती मिळताच अकोला पोलिसांनी तात्काळ धाव घेतली असून सुरक्षेच्या दृष्टीने मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. 'पेपरफुटी विरोधी कायद्यानुसार' तात्काळ गुन्हे दाखल करून त्यांची रवानगी तुरुंगात करण्यात यावी. बाधित विद्यार्थ्यांना त्वरित न्याय मिळवून देऊन सर्व प्रक्रिया अत्यंत पारदर्शक पद्धतीने राबवण्यात यावी.

---

विरला जानन्ति गुणान् विरलाः कुर्वन्ति निर्धने स्नेहम्।
विरलाः परकार्यरताः परदुःखेनापि दुःखिता विरलाः।।

गुण ओळखणारे विरळ असतात, निर्धनावर स्नेह करणारे विरळ असतात,
दुसऱ्यांसाठी काम करणारे विरळ असतात, दुसऱ्यांच्या दुःखाने दुःखी होणारे विरळ असतात.


स्व. दादासाहेब काळमेघ

एकोणतिसावें पुण्यस्मरण

स्व. दादासाहेब काळमेघ स्मृती प्रतिष्ठान तर्फे स्व. दादासाहेबांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन करण्याच्या निमित्ताने, एकोणतिसावा पुण्यस्मरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास पुढील मान्यवर उपस्थित राहतील.

**अमरावती**

अध्यक्ष
मा. श्री. हर्षवर्धन प्र. देशमुख (अध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती)

प्रमुख पाहुणे
मा. प्रा. डॉ. श्री. अविनाश वा. आवलगावकर (कुलगुरू, मराठी भाषा विद्यापीठ, रिध्दपूर, अमरावती)
मा. ह.भ.प. श्री. सत्यपाल महाराज (सप्तखंजिरीवादक)
मा. श्री. शैलेश दि. पांडे (मुख्य संपादक, तरूण भारत, नागपूर)
मा. श्री. सुभाष त्र्यं. बेलसरे (माजी कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर)

बुधवार, दि. २९ जुलै २०२६, सायंकाळी ५.०० वा.
स्थळ : छत्रपती श्री शिवाजी महाराज सभागृह, डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती

**नागपूर**

अध्यक्ष
मा. डॉ. श्री. वेदप्रकाश मिश्रा (मुख्य सल्लागार, कृष्णा विश्व विद्यापीठ, (अभिमत विद्यापीठ), कराड)

प्रमुख पाहुणे
मा. डॉ. सौ. मनाली क्षीरसागर (कुलगुरू, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर)
मा. डॉ. श्री. रामदास चवरे (जेष्ठ साहित्यिक तथा माजी प्राचार्य, बापूसाहेब पठारे महाविद्यालय, पुणे)

बुधवार, दि. २९ जुलै २०२६, सायंकाळी ५.३० वा.
स्थळ : मातोश्री विमलाबाई देशमुख सभागृह, धनवटे नॅशनल कॉलेज, नागपूर

**नागपूर**

एकोणतिसावा पुण्यस्मरण कार्यक्रम बुधवार, दि. २९ जुलै २०२६ रोजी दुपारी १.३० वा. स्व. दादासाहेब काळमेघ स्मृती दंत महाविद्यालय व रुग्णालय हिंगणा, जि. नागपूर येथे आयोजित केला आहे.

उपरोक्त कार्यक्रमास आपण आवर्जून उपस्थित राहावे, ही विनंती.

स्व. दादासाहेब काळमेघ स्मृती प्रतिष्ठान अमरावती SWARGIYA DADASAHEB KALMEGH SMRUTI PRATISHTAN

ACCREDITED WITH GRADE A+ NAAC

स्वर्गीय दादासाहेब काळमेघ स्मृती दंत महाविद्यालय व रुग्णालयाची नमीरा सिद्दिकी NEET-MDS-2026 मध्ये देशात प्रथम, AIR 1

सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार - 2023 SILVER 25 JUBILEE MUHS

स्व. दादासाहेब काळमेघ स्मृती प्रतिष्ठान अमरावती SWARGIYA DADASAHEB KALMEGH SMRUTI DENTAL COLLEGE & HOSPITAL

विनीत : स्व. दादासाहेब काळमेघ स्मृती प्रतिष्ठान

सिटी न्यूज सुपरफास्ट
विविधा
२
बुधवार, दि. २९ जुलै २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com

# गुरु पौर्णिमा: महत्त्व, इतिहास आणि परंपरा

भारतीय संस्कृतीत गुरूला ईश्वरापेक्षाही उच्च स्थान देण्यात आले आहे. अज्ञानाचा अंधकार दूर करून ज्ञानाचा प्रकाश दाखवणाऱ्या गुरूंबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा अत्यंत पवित्र सण म्हणजे गुरु पौर्णिमा. हा उत्सव आषाढ महिन्यातील पौर्णिमेला साजरा केला जातो. गुरु पौर्णिमा आदर, कृतज्ञता आणि गुरु-शिष्य परंपरेचा महान उत्सव आहे. भारतीय संस्कृतीत 'गुरु' या शब्दाला अत्यंत पवित्र आणि उच्च स्थान दिले गेले आहे. गुरु म्हणजे केवळ ज्ञानाचे साधन नव्हे, तर अंधाराकडून प्रकाशाकडे नेणारा मार्गदर्शक. अशा या गुरुप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि त्यांच्या चरणी आदरपूर्वक नतमस्तक होण्यासाठी 'गुरु पौर्णिमा' हा सण संपूर्ण देशात मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो.

गुरु पौर्णिमेचे महत्त्व, 'गुरु' हा शब्द दोन अक्षरांपासून बनला आहे: गु म्हणजे 'अंधार' (अज्ञान), रु म्हणजे 'प्रकाश' (ज्ञान). थोडक्यात सांगायचे तर, आपल्या मनातील अज्ञानाचा अंधकार दूर करून ज्ञानाचा प्रकाश देणारी व्यक्ती म्हणजेच 'गुरु'. आपल्या आयुष्यातील पहिली गुरु ही आपली आई असते, जी आपल्याला जगामध्ये पहिलं पाऊल टाकायला शिकवते. त्यानंतर वडील आणि शिक्षक आपल्याला ज्ञानाची, संस्कारांची आणि जगण्याची खरी दिशा दाखवतात. तसेच आयुष्यात वेगवेगळ्या टप्प्यांवर भेटणाऱ्या व्यक्ती ज्यांच्याकडून आपल्याला काही ना काही शिकायला मिळते, त्या सर्व गुरुसमानच असतात.

व्यास पौर्णिमा (इतिहास आणि पौराणिक संदर्भ) गुरु पौर्णिमेला 'व्यास पौर्णिमा' असेही म्हणतात. महर्षी वेदव्यास:




ज्यांनी चार वेदांची विभागणी केली, १८ पुराणे आणि महाभारतासारख्या महान ग्रंथाची रचना केली, त्या महर्षी वेदव्यास यांचा जन्म या दिवशी झाला होता. महर्षी वेदव्यास हे विश्वाचे आद्यगुरु मानले जातात. त्यांनी मानवाला ज्ञान आणि संस्कृतीचा अमूल्य ठेवा दिला. म्हणूनच त्यांच्या जयंतीनिमित्त गुरु पौर्णिमा साजरी केली जाते आणि गुरुपूजनाची सुरुवात केली जाते.

### गुरु पौर्णिमेचे स्वरूप आणि उत्सव

गुरुपूजन: या दिवशी शिष्य आपल्या गुरुंच्या आश्रमात, घरी किंवा शाळेत जाऊन त्यांच्या चरणी पुष्प अर्पण करतात, त्यांचा आशीर्वाद घेतात आणि भेटवस्तू देऊन कृतज्ञता व्यक्त करतात. आध्यात्मिक महत्त्व: मंदिर आणि आश्रमांमध्ये विशेष पूजा, भजन, कीर्तन आणि महाप्रसादाचे आयोजन केले जाते. साधक आणि शिष्य या दिवशी ध्यान आणि साधनेला विशेष महत्त्व देतात. शाळा आणि महावि्यालये: शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थी शिक्षकांबद्दल आदर व्यक्त करण्यासाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रम, भाषणे आणि गुरुपूजनाचे कार्यक्रम आयोजित करतात.

### आजच्या आधुनिक युगात गुरु पौर्णिमेचे स्थान

आजचे जग वेगाने बदलत आहे. तंत्रज्ञानाच्या युगात इंटरनेटवर माहितीचा खजिना उपलब्ध आहे; परंतु 'माहिती' आणि 'ज्ञान' यात फार मोठा फरक आहे. इंटरनेट आपल्याला माहिती देऊ शकते, पण 'काय योग्य आणि काय अयोग्य' यातील फरक समजण्याची विवेकबुद्धी फक्त गुरुच देऊ शकतात. म्हणूनच आजच्या डिजिटल युगातही गुरुंचे स्थान अबाधित आणि तितकेच महत्त्वाचे आहे. गुरु पौर्णिमा हा केवळ एक सण नाही, तर तो आपल्या आयुष्याला आकार देणाऱ्या सर्व मार्गदर्शकांप्रती ऋण व्यक्त करण्याचा दिवस आहे. आपण मिळवलेले यश, ज्ञान आणि संस्कार हे गुरुंच्या कृपेचेच फळ असते. या गुरु पौर्णिमेच्या निमित्ताने आपण आपल्या सर्व गुरुंच्या शिकवणीचे पालन करण्याचा आणि समाजात ज्ञानाचा व चांगल्या संस्कारांचा प्रसार करण्याचा संकल्प करूया.

"गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरुः साक्षात् परं ब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ॥"

सर्व गुरुजनांना गुरु पौर्णिमेच्या हार्दिक शुभेच्छा!

# बोगस बियाण्यातून शेतकऱ्यांची फसवणूक गंभीर बाब

बोगस बियाण्यांमुळे शेतकऱ्यांची होणारी फसवणूक ही महाराष्ट्रातील आणि एकूणच देशातील कृषी क्षेत्रातील एक गंभीर आणि चिंताजनक समस्या आहे. हंगामाच्या सुरुवातीला बोगस बियाणे, खते किंवा कीटकनाशके वापरल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होते आणि त्यांची संपूर्ण वर्षाची मेहनत वाया जाते.

### बोगस बियाण्यांचे दुष्परिणाम

उगवण न होणे किंवा कमी होणे: बियाणे जमिनीत पेरल्यानंतर ते उगवतच नाही किंवा उगवण क्षमता खूप कमी असते.

**दुबार पेरणीचे संकट:** पिके न उगवल्यामुळे शेतकऱ्यांवर दुबार पेरणीची वेळ येते, ज्यामुळे बियाणे, खते आणि मजुरीचा अतिरिक्त खर्च होतो.

**उत्पादनात प्रचंड घट:** बियाणे बोगस असल्यास पिकांची योग्य वाढ होत नाही किंवा फळ/धान्य धारणा होत नाही.

**कर्जबाजारीपणा:** पेरणीसाठी घेतलेले कर्ज किंवा भांडवल वाया गेल्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडतात.

### फसवणूक टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी घ्यावयाची काळजी

**१. अधिकृत विक्रेत्याकडूनच खरेदी :** बियाणे नेहमी कृषी विभागाचा परवाना असलेल्या मान्यताप्राप्त विक्रेत्याकडूनच (Authorized Dealer) खरेदी करावे. रस्त्यावर किंवा अनधिकृत व्यक्तींकडून स्वस्त दरात मिळणारे बियाणे अजिबात घेऊ नका.

**२. पक्के बिल (पावती) घेणे:**

बियाणे खरेदी करताना विक्रेत्याकडून GST किंवा अधिकृत सही व शिक्का असलेले पक्के बिल आवर्जून घ्या. बिलावर बियाण्याचा प्रकार, वाण (Variety), लॉट नंबर (Lot No.), मुदत संपण्याची तारीख (Expiry Date) आणि किंमत स्पष्ट लिहिलेली असावी.

**३. वेष्टन (Packaging) आणि टॅग तपासा:**

बियाण्याच्या पिशवीचे सील किंवा पॅकिंग टॅम्पर (फोडलेले) केलेले नाही ना, याची खात्री करा. पिशवीवर असणारा प्रमाणित टॅग (Certified Tag) किंवा क्यूआर कोड तपासा.

**४. पुरावे जपून ठेवा:**

बियाण्याची रिकामी पिशवी/गोणी, टॅग आणि खरेदीचे बिल पिकाची पाहणी किंवा कापणी होईपर्यंत सुरक्षित जपून ठेवा. पेरणीपूर्वी बियाण्याचा थोडा नमुना (Sample) वेगळा काढून ठेवावा.

**५. घरगुती उगवण क्षमता चाचणी:**

पेरणी करण्यापूर्वी १०० बियाण्यांचा नमुना घेऊन घरीच त्यांची उगवण क्षमता (Germination Test) तपासावी. ७०-८०% पेक्षा जास्त बियाणे उगवल्यास पेरणीसाठी योग्य समजावे. फसवणूक झाल्यास काय करावे? (तक्रार निवारण) जर बियाणे उगवले नाही किंवा बोगस निघाले, तर त्वरित खालील पावले उचलावीत:

**कृषी अधिकाऱ्यांशी संपर्क:** त्वरित आपल्या क्षेत्रातील कृषी सहाय्यक, तालुका कृषी अधिकारी (TAO) किंवा पंचायत समितीच्या कृषी विकास अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार नोंदवावी.

**तक्रार निवारण समितीची पाहणी:** कृषी विभागाची तक्रार निवारण समिती (District/Taluka Grievance Committee) शेतात येऊन पिकाचा पंचनामा करते आणि बियाण्याच्या दर्जाची पाहणी करते.

**ग्राहक न्यायालयात दाद:** कृषी विभागाच्या पंचनाम्याचा अहवाल, खरेदीचे पक्के बिल आणि बियाण्याची पिशवी/टॅग यांच्या आधारे शेतकरी जिल्हा ग्राहक मंचाकडे (Consumer Court) नुकसानभरपाईसाठी दावा दाखल करू शकतात.

**टोल-फ्री हेल्पलाईन:** कृषी विभागाच्या टोल-फ्री क्रमांकावर किंवा किसान कॉल सेंटरवर संपर्क साधून मदत घेता येते. बोगस बियाणे विकणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यासाठी कृषी विभागाकडून विशेष भरारी पथके तैनात केली जातात. फसवणूक झाल्यास गप्प न राहता तत्काळ तक्रार नोंदवणे अत्यंत आवश्यक आहे.

# उन्मादाची किंमत मोजावी लागेल

नीट च्या परीक्षेचा पेपर फुटला. त्याचा आणि काही विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याचा निषेध नोंदवण्यासाठी तसेच केंद्रीय शिक्षण मंत्र्यांनी राजीनामा द्यावा आणि अन्य काही मागण्यांसाठी जंतरमंतर वर तथाकथित विद्यार्थ्यांचा आंदोलनाच्या नावाखाली धिंगाणा सुरू होता. हिंदू देवतांमुळे पेपर फुटला नाही, त्यांच्यामुळे विद्यार्थ्यांनी आत्महत्या देखील केल्या नाहीत. तरी आंदोलन कर्ते हिंदू देवतांचा अपमान करत होते. देशाच्या पंतप्रधानां बद्दल शिवराळ भाषा वापरली गेली. भारतीय सैन्या बद्दल आक्षेपार्ह विधानं करण्यात आली. सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करून, सुरक्षा दलाच्या जवानांवर हल्ला करण्यात आला. देश विरोधी घोषणा देण्यात आल्या. वृत्तवाहिन्यांना मुलाखत देतांना आंदोलकांची भाषा, हावभाव अतिशय असभ्य होते. यात महिला अग्रेसर होत्या. ज्यांना आपण डोक्यावर घेऊन मिरवतो अशी नेते मंडळी आणि ख्यातनाम व्यक्ती आंदोलकांना पाठिंबा देण्यासाठी भेटत होते. परंतु कोणीही आंदोलकांना त्यांच्या असभ्य वर्तना बद्दल समजवण्याचा प्रयत्न केला नाही. कारण पोळी शेकायची होती, हात जाळून घ्यायचे नव्हते. आपल्या देशाचे संविधान धोक्यात आले असून, हुकुमशाही सुरु असल्याचा कांगावा काही मंडळी कायम करतात. १९८९ मध्ये चीनच्या बिजिंग शहरातील तियानमेन चौकात लोकशाहीची मागणी करणारे विद्यार्थी निशस्त्र आणि शांततापूर्ण आंदोलन करत होते. ३ जुन १९८९ च्या रात्री चीन च्या पीपल्स लिबरेशन आर्मीने (PLA) आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर रणगाडे घुसवले. ज्यात हजारो विद्यार्थी आणि नागरिक मारल्या गेले. चीन च्या या राक्षसी कृतीचं समर्थन करत नाही. तात्पर्य इतकेच की, चीन मध्ये शांततापूर्ण आंदोलन देखील अश्या प्रकारे चिरडले जाते. या आंदोलनात काहीजण तर पूर्ण तयारीनिशी मैदानात उतरले होते. आंदोलकांनी शिक्षण तसेच परीक्षा पद्धतीत सुधारणा करण्याबाबत मागणी केलेली नाही. विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने हि मागणी आवश्यक होती. शिक्षण मंत्र्यांनी राजीनामा दिला, नव्या मंत्र्यांनी पदभार सांभाळला, केंद्र सरकारने काही मागण्या देखील मान्य केल्या. शिक्षण आणि परीक्षा पद्धतीत सुधारणा व्हावी या दृष्टीने सरकार सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. परंतु ते हाणून पाडण्यासाठी भारत तोडो टोळी सज्ज आहे. जंतरमंतर वरील आंदोलन हे विद्यार्थी हितासाठी नव्हते हे सिद्ध झाले आहे. आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्यांनी हे विसरू नये, उपयोगिता संपली की, त्यांची जागा अडगळीत असेल. देशाने युवकांचे इतके बिभीत्स आंदोलन प्रथमच बघितलं. आंदोलनात कुठलीही घटना अनावधानाने घडलेली नाही. त्याबद्दल आंदोलनकर्त्यांनी कुठलाही खेद व्यक्त केलेला नाही. इतकं सर्व करूनही त्यांची भाषा मग्रुरीची आहे. राष्ट्रप्रेमी युवक आणि नागरिक त्यामुळे व्यथित झाले आहेत. योग्य वेळ आली की, लोकं त्यांना आपली जागा दाखवून देतील. आंदोलनकर्ते आणि त्यांच्या पाठीराख्यांना भविष्यात याची मोठी किंमत मोजावी लागेल. कारण अती केलं त्याची माती होणारच.

**हेमंत जकाते**
अकोला

# जुलै महिन्यातील पाऊस पिकांसाठी ठरला पोषक

महाराष्ट्र राज्यातील खरीप हंगाम हा कृषी क्षेत्राचा पाठीचा कणा मानला जातो. चालू हंगामाच्या सुरुवातीला म्हणजेच जून महिन्यात पावसाने ओढ दिल्याने पेरण्या खोळंबल्या होत्या. मात्र, जुलै महिन्यातील दमदार आणि सार्वत्रिक पावसामुळे राज्यातील खरीप पेरण्यांनी जोरदार मुसंडी मारली आहे. महाराष्ट्रातील खरीप हंगामाची सद्यस्थिती समाधानकारक आहे.

### १. पेरण्यांचा आढावा आणि प्रगती

जून महिन्यातील पावसाच्या तुटवड्यामुळे सुरुवातीला पेरणीची गती संथ होती. परंतु जुलै महिन्यातील चांगल्या पावसामुळे जमिनीत पुरेसा ओलावा निर्माण झाला आणि पेरण्यांना वेग मिळाला.

**एकूण पेरणी क्षेत्र:** महाराष्ट्रातील खरीप हंगामाचे सरासरी क्षेत्र सुमारे १४४.३६ लाख हेक्टर आहे. त्यापैकी जुलै अखेरपर्यंत सुमारे ८२% क्षेत्रावर (सुमारे ११७.६८ लाख हेक्टर) पेरण्या पूर्ण झाल्या आहेत.

**भात लावणीची स्थिती:** कोकण आणि पूर्व विदर्भात पावसाने पुन्हा जोर धरल्यामुळे भात पिकाच्या पुनर्लावणीच्या (रोप लावणी) कामांना मोठा वेग आला आहे.



### २. प्रमुख पिकांचे चित्र

या हंगामात शेतकऱ्यांनी नगदी पिके तसेच मक्याला जास्त पसंती दिल्याचे स्पष्ट दिसत आहे. विदर्भात कापूस, सोयाबीन, तूर या पिकांना प्राधान्य दिले जाते. या भागातील पिकांना देखील जुलै महिन्यात झालेल्या पावसामुळे दिलासा मिळाला आहे. खरीप हंगाम शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. या हंगामावर वर्षभराचे नियोजन असते. या हंगामात शेतकऱ्यांना विविध समस्यांचा सामना करावा लागतो आहे. बोगस बियाण्यामुळे दुबार पेरणी करावी लागली. तसेच त्यानंतर पावसाने पाठ फिरवली त्यामुळे त्याचा परिणाम देखील खरीप हंगामावर झाला.

# पर्यावरण संरक्षण आणि हवामान बदल: आजची मोठी गरज

आज संपूर्ण जग एका मोठ्या संकटाचा सामना करत आहे, ते म्हणजे 'वातावरणातील बदल' (Climate Change) आणि 'जागतिक तापमानवाढ' (Global Warming). गेल्या काही दशकांत मानवाने केलेल्या निसर्गाच्या अनिर्बंध शोषणामुळे पर्यावरणाचा समतोल पार ढासळला आहे. एकेकाळी ऋतूंचे चक्र अत्यंत नियमित आणि निसर्गाचे नियम स्पष्ट होते; परंतु आज अवेळी होणारा पाऊस, प्रचंड दुष्काळ, उष्णतेच्या लाटा आणि चक्रीवादळे यांसारख्या नैसर्गिक आपत्ती नित्यनियमाच्या बनल्या आहेत.

### वातावरणातील बदलांची मुख्य कारणे

वातावरणातील बदलांमागे मानवी आणि काही अंशी नैसर्गिक कारणे आहेत, परंतु मानवी हस्तक्षेप हा यातील सर्वात मोठा घटक आहे.

**प्रदूषण आणि हरितगृह वायू (Greenhouse Gases):** कारखाने, वाहने आणि औष्णिक वीजनिर्मिती केंद्रांमधून मोठ्या प्रमाणावर कार्बन डायऑक्साइड, मिथेन आणि इतर हानिकारक वायू हवेत सोडले जातात. हे वायू सूर्याची उष्णता वातावरणात अडकवून ठेवतात, ज्यामुळे पृथ्वीचे तापमान वाढते.

**अमर्याद वृक्षतोड (Deforestation):** झाडे वातावरणातील कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात आणि ऑक्सिजन सोडतात. परंतु रस्ते, शहरे आणि उद्योगांच्या विस्तारासाठी लाखो झाडे तोडली जात आहेत.

**जीवाश्म इंधनाचा (Fossil Fuels) अतिवापर:** कोळसा, पेट्रोल, डिझेल यांसारख्या इंधनांचा अमर्याद वापर हे प्रदूषणाचे मुख्य कारण आहे.

**औद्योगिकीकरण आणि शहरीकरण:** प्लास्टिकचा वापर, कचऱ्याचे अयोग्य व्यवस्थापन आणि काँक्रिटची जंगले उभी राहिल्यामुळे स्थानिक स्तरावरही तापमान प्रचंड वाढत आहे.

### वातावरणातील बदलांचे गंभीर परिणाम

या बदलांचे परिणाम आता केवळ निसर्गापुरते मर्यादित राहिले नसून ते मानवी अस्तित्वालाच आव्हान देत आहेत:

**ऋतूचक्राचा बिघाड:** पावसाचा अनियमिता वाढली आहे. कधी एकाच दिवशी ढगफुटीसदृश पाऊस पडतो, तर कधी संपूर्ण ऋतूत दुष्काळ असतो.

शेती आणि अन्नसुरक्षेवर परिणाम: हवामानातील अनपेक्षित बदलांमुळे पिकांचे अतोनात नुकसान होते, ज्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बिघडते आणि जगभरात अन्नधान्याची टंचाई निर्माण होण्याचा धोका वाढतो.

**हिमनद्यांचे वितळणे आणि समुद्राच्या पातळीत वाढ:** ध्रुवीय प्रदेशातील बर्फ वेगाने वितळत आहे, ज्यामुळे समुद्राची पातळी वाढत असून किनारपट्टीवरील शहरे पाण्याखाली जाण्याचा धोका निर्माण झाला आहे.

**आरोग्याच्या समस्या:** अतिउष्णता, नवीन आजार, दूषित हवा आणि पाणी यामुळे मानवी आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. उपाययोजना आणि आपली जबाबदारी हवामान बदलाचे संकट रोखण्यासाठी जागतिक पातळीवर प्रयत्न सुरू आहेतच, पण व्यक्तिगत पातळीवरही आपण खालील गोष्टी करणे गरजेचे आहे:

**वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धन:** जास्तीत जास्त झाडे लावणे आणि ती जगवणे ही काळाची गरज आहे.

**अक्षय ऊर्जेचा (Renewable Energy) वापर:** सौर ऊर्जा (Solar Energy) आणि पवन ऊर्जेचा वापर वाढवणे आवश्यक आहे.

**वाहनांचा मर्यादित वापर:** सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, ई-वाहने (EVs) किंवा सायकलींचा वापर वाढवून कार्बन उत्सर्जन कमी करता येते.

**प्लास्टिकमुक्ती आणि शून्य कचरा (Zero Waste):** सिंगल-यूज प्लास्टिकचा पूर्ण वापर टाळणे आणि कचऱ्याचे योग्य वर्गीकरण करणे.

### निष्कर्ष

"निसर्ग मानवाची गरज भागवू शकतो, पण मानवाचा लोभ नाही," हे महात्मा गांधींचे विचार आज तंतोतंत लागू पडतात. निसर्गाने आपल्याला राहण्यासाठी एक सुंदर पृथ्वी दिली आहे. जर आपण आजच वातावरणातील बदलांकडे गांभीर्याने पाहिले नाही, तर येणाऱ्या पिढ्यांसाठी राहण्यायोग्य पृथ्वी उरणार नाही. म्हणूनच, 'निसर्गाचे रक्षण हीच आपली सुरक्षा' हा ध्यास घेऊन आपण सर्वांनी एकत्र येऊन काम करणे गरजेचे आहे.

# प्राध्यापक भरतीत मान्यता प्राप्त पदवींमध्ये भेदभाव

महाराष्ट्रातील विद्यापीठ प्राध्यापक भरती प्रक्रियासाठी महाराष्ट्र उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या ११ फेब्रुवारी २०२६ च्या शासन निर्णयानुसार, राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांमधील प्राध्यापक भरती प्रक्रियेत आमूलाग्र बदल करण्यात आले आहेत. यामध्ये पारदर्शक ६०:२०:२० मूल्यांकन सूत्र लागू करण्याचे ठरविले आहे. अंतिम निवडीचा गुण १००-गुणांच्या संरचित आराखड्यात ६० टक्के शैक्षणिक व संशोधन कामगिरीवर,२० टक्के अध्यापन कौशल्य व २० टक्के वैयक्तिक मुलाखतीतील कामगिरीसाठी ठेवण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सुधारित सरकारी नियमानुसार, *सहायक प्राध्यापक भरती प्रक्रियेत पदवी,पदव्युत्तर पदवी, एम. फिल. आणि पीएच.डी. साठी शैक्षणिक कामगिरी अंतर्गत गुण हे पदवी प्रदान करणाऱ्या विद्यापीठाच्या दर्जानुसार (रँकिंग)दिले जाणार आहे.* जर उमेदवाराने नॅशनल इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्क (एनआयआरएफ) क्रमवारीत १०० च्या आत असलेल्या विद्यापीठाची किंवा जागतिक विद्यापीठ क्रमवारीत ५०० च्या आत असलेल्या परदेशी विद्यापीठाची पदवी प्राप्त केली असल्यास त्याच्या गुणांची गणना,उमेदवाराने मिळवलेल्या पदवी /पदव्युत्तर पदवी / एम.फील. पदवी गुणांच्या संबंधित टक्केवारी अंतर्गत दिलेल्या गुणांना ०१ च्या घटकाने गुणून, केली जाईल.उदा. जर तुम्हाला पदवीमध्ये ७५ टक्के गुण मिळाले असतील, तर गुणांकनानंतर ते ७५ × १ = ७५ गुणच राहतील. एनआयआरएफ

च्या १०१-२०० क्रमवारीत असलेल्या कोणत्याही श्रेणी क्रमांक किंवा शांघाय जागतिक विद्यापीठ क्रमवारी ५०१-१००० च्या दरम्यान असलेल्या परदेशी विद्यापीठांच्या बाबतीत, गुणांची गणना, पदवी / पदव्युत्तर / एमफील च्या संबंधित टक्केवारी अंतर्गत दिलेल्या गुणांना ०.९ ने गुणाकार करून केली जाईल. उदा. जर तुम्हाला ७५ टक्के गुण मिळाले असतील, तर गुणांकनानंतर ते ७५ × ०.९ = ६७.५ गुण होतील. इतर विद्यापीठ अनुदान आयोगाव्दारा मान्यताप्राप्त विद्यापीठांसाठी, उमेदवाराने मिळवलेल्या पदवी/ पदव्युत्तर/ एम.फील. पदवी गुणांच्या संबंधित टक्केवारी अंतर्गत दिलेल्या गुणांना ०.८ ने गुणाकार करून गुणांकन केले जाईल.

*'स्कोर'* सारखे गोंडस नाव देऊन मिळालेल्या ग्रेड किवा पर्सेंटेजला १ किंवा ०.९ किंवा ०.८ गुणणे आणि शेवटी ते गुण कमी करणे आहे, हा अधिकार कोणत्याही नियुक्ती करणाऱ्या संस्थांना आहे का,हा पण एक वादाचा मुद्दा होऊ शकतो, कारण विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे मान्यताप्राप्त सर्व विद्यापीठे आणि त्यांच्याशी संलग्न महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांना मिळालेल्या पदवी/गुणांचा दर्जा समान मानला जातो. आज पद भरतीसाठीची हे सूत्र लागू केले, उद्या उच्च शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी पण हेच सूत्र लागू शकेल. तसेच १,०.९ व ०.८ हे घटक कोणत्या आधारावर ठरविले आहेत? याला काही शास्त्रीय आधार आहे की चहा पिताना चार लोकांना वाटले म्हणून तसा नियम करण्यात आला? असे करणे 'मनमानी' व 'भेदभावपूर्ण' आहे,असेच वाटते.

बहुतांश उमेदवार हे नॅशनल इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्क (एनआयआरएफ) क्रमवारीत १००/२०० च्या आत असलेल्या विद्यापीठाची किंवा जागतिक विद्यापीठ क्रमवारीत ५००/१००० च्या आत असलेल्या परदेशी विद्यापीठाची पदवी प्राप्त करू शकत नाही त्यामुळे अन्य ठिकाणाहून पदवी/ पदव्युत्तर पदवी प्राप्त करणारे उमेदवार शैक्षणिक कामगिरीच्या गुणांच्या तालिकेत कमी पडतील व त्यांची निवड सूचीत येण्याची शक्यता कमी राहील. सहायक प्राध्यापक पदासाठी पात्रता ही केवळ युजीसी मान्यताप्राप्त विद्यापीठातून किमान ५५ टक्के पदव्युत्तर पदवी असताना, *उमेदवाराने पदवी/ पदव्युत्तर पदवी प्राप्त केलेल्या विद्यापीठाच्या दर्जानुसार त्याच्या गुणांना भारांश देणे तितकेसे योग्य वाटत नाही.यामुळे ग्रामीण/दुर्गम भागातील पात्र उमेदवार स्पर्धेत मागे पडण्याची शक्यता नाकारता येत नाही*.तसेच,येथे अजून एक प्रश्न निर्माण होतो की राष्ट्रीय संस्थात्मक रँकिंग फ्रेमवर्क (एनआयआरएफ) योजना २९ सप्टेंबर २०१५ रोजी शिक्षण मंत्रालयाने (तत्कालीन मानव संसाधन विकास मंत्रालय) सुरू केली,मग यापूर्वी पदवी किंवा पदव्युत्तर पदवी प्राप्त केलेल्या उमेदवारांच्या पदवी/पदव्युत्तर परीक्षेत प्राप्त गुणांना भारांश कसे देणार?

सरकारी किंवा सरकारी अनुदानित संस्थेच्या सहायक प्राध्यापक भरती प्रक्रियेत अशा प्रकारच्या भारांश (वेटेज) देणे, संविधानाच्या कलम १४ (समानतेचा हक्क) आणि कलम १६ (सार्वजनिक नोकरीत समान संधी) यांचे उल्लंघन ठरू शकते का, यावर कायदेशीर आणि प्रशासकीय दृष्टिकोनातून बघणे पण जरूरीचे वाटते. कोणतीही नियमावली करताना ती तर्कसंगत आधारावर (रेशनल नेक्सस) असावी लागते. जर एनआयआरएफ क्रमवारीचा आधार घेऊन गुणांमध्ये कपात केली जात असेल, तर त्यामागे काही शास्त्रीय निकष काय आहेत,हे तपासणे पण आवश्यक आहे.जर हे निकष केवळ चहाच्या टेबलावर ठरविले असतील आणि त्याला कोणत्याही ठोस संशोधनाचा किंवा शैक्षणिक डेटाचा आधार नसेल, तर न्यायालय अशा धोरणांना 'मनमानी' ठरवून रद्द करू शकते.

जेव्हा सर्व विद्यापीठे, विद्यापीठ अनुदान आयोगानेद्वारे मान्यताप्राप्त असतात,अशा वेळी, एकाच दर्जाची पदवी मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये केवळ त्यांच्या विद्यापीठ/महाविद्यालयाच्या क्रमवारीमुळे भेदभाव करणारे 'वर्गीकरण' निकषात बसत नाही. समान शैक्षणिक पात्रता असलेल्या उमेदवारांना समान संधी मिळणे हा त्यांचा मूलभूत अधिकार आहे. त्यांना अशा 'भेदभावपूर्ण' पध्दतीने काढलेल्या गुणांच्या आधारे स्पर्धेतून बाहेर काढणे हे चूकीचे ठरू शकते.

महाराष्ट्रात,वर्ष २०२५ मध्ये १ ते १०० एनआयआरएफ क्रमवारीमध्ये मुंबई आणि पुणे विद्यापीठ सोडले तर महाराष्ट्रातील एकही विद्यापीठ नाही. काही आहेत पण ती खाजगी विद्यापीठे आहेत. मग महाराष्ट्रातील बाकीच्या विद्यापीठांतून शिकलेल्या विद्यार्थ्यांचे काय? ते गुणांच्या तालिकेत मागे पडतील व ते निवडसूचीत शक्यता पण कमी असेल.काय अशाने मागासलेल्या विदर्भ व मराठवाड्यातील पात्र उमेदवार या स्पर्धेत टिकतील? शासकीय नोकरीत या मागासलेल्या विभागांचा वाटा पहिलेच कमी आहे,त्यात या भागांतील पात्र उमेदवार निवडसूचितच न आल्यास, या विभागांचा शासकीय नोकरीत वाटा अजून कमी होईल.

मागासलेल्या व ग्रामीण भागातील उमेदवारांना मुख्य प्रवाहात आणणे हे राज्याचे कर्तव्य (डायरेक्टिव्ह प्रिन्सिपल्स) आहे, परंतु या नियमामुळे नेमके उलट घडत आहे. हे धोरण 'प्रिव्हिलेज्ड' शहरी वर्गाला झुकते माप देत असल्याचे दिसते, जे सामाजिक न्याय तत्त्वांच्या विरोधात आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षकांची भरती करून उच्च शैक्षणिक संस्थांच्या गुणवत्तेचा दर्जा राखणे हे एक ध्येय असू शकते, परंतु ते साध्य करण्यासाठी, उमेदवारांनी स्वतःच्या मेहनतीने मिळविलेल्याला गुणांना एखादे अशास्त्रीय सूत्र लावून 'कमी करणे' हा मार्ग चुकीचा वाटतो. लोकशाहीत धोरणे ही सर्वसमावेशक असावीत, केवळ काही विशिष्ट वर्गाला सोयीची नसावीत,असे येथे आग्रहाने सांगावेसे वाटते.

**प्रा .संजय खडक्कार,**
माजी तज्ज्ञ सदस्य, विदर्भ वैधानिक विकास मंडळ. मोबाईल क्रमांक: 7276614260


सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
३
बुधवार, दि. २९ जुलै २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com

# 15 ऑगस्ट पासून राज्यात मिळणार स्मार्ट राशन कार्ड

## सार्वजनिक वितरण प्रणाली होईल पारदर्शी... धान्याचा काळाबाजार होईल बंद

प्रतिनिधी २९ जुलै

**अकोला:** राशन दुकानांमध्ये ग्राहकांच्या हक्काच्या धान्याचा काळाबाजार करणाऱ्यांवर चाप लावण्यासाठी तसेच महाराष्ट्राची सार्वजनिक वितरण प्रणाली पूर्णपणे डिजिटल करण्यासाठी शासनाने मोठा निर्णय घेतला आहे. राज्यात १५ ऑगस्टपासून क्यूआर कोड आधारित स्मार्ट रेशन कार्डचे वितरण केले जाईल. नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्रालयातर्फे मिळालेल्या माहितीनुसार या महत्त्वाकांक्षी मोहिमेअंतर्गत राज्यातील अंदाजे 1.70 कोटी कुटुंबांना टप्प्याटप्प्याने



स्मार्ट रेशन कार्ड प्रदान केले जातील. ही मोहीम 'कै. अजितदादा पवार लोक कल्याण स्मार्ट रेशन कार्ड वितरण मोहीम' या नावाने राबवली जाईल. ही स्मार्ट रेशन कार्ड राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा आणि एपीएल-किसान योजनेच्या सर्व पात्र लाभार्थ्यांना विनामूल्य वितरित केली जातील. नवीन क्यूआर कोड आधारित स्मार्ट रेशन कार्डमुळे लाभार्थ्यांची माहिती अधिक सुरक्षित राहील. सरकारचा दावा आहे की, यामुळे सार्वजनिक वितरण प्रणालीमध्ये पारदर्शकता वाढेल, फसवणूक रोखली जाईल, सेवांचा वेग वाढेल आणि लाभार्थ्यांना अधिक सोयीस्कर सेवा मिळतील. प्रकल्पाचा पहिला टप्पा नंदुरबार आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर राबवला जाईल. तांत्रिक पुनरावलोकनानंतर, ही योजना टप्प्याटप्प्याने संपूर्ण महाराष्ट्रात विस्तारली जाईल.

## 15 वर्षीय अल्पवयीन पीडितेस पळविले

प्रतिनिधी २९ जुलै

**तेल्हारा :** १५ वर्षीय अल्पवयीन कुमारीकेस गत दि ४ जानेवारी ते ५ जानेवारी २०२६ दरम्यान आरोपी जतन बाबुलाल द्विवेदी वय २० वर्षे रा. पटेल मोहल्ला रोहिणी, जिल्हा बऱ्हाणपूर (मध्यप्रदेश) याने लझाकरिता फुस लावून पळवून नेले होते. अशी तक्रार तेल्हारा पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला होता. आरोपीने पिडितेला फुस लावून पळवून नेऊन लग्न केल्याचे भासवून तिचे शारीरिक शोषण केले. प्रकरणी तेल्हारा पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संतोप इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली व आदेशाने तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक निलेश ठाकरे व पोलीस कॉन्स्टेबल संदीप तांदूळकर, महिला पोलीस कॉन्स्टेबल विशाखा पाटील यांनी मध्यप्रदेशातून आरोपी जतन बाबूलाल द्विवेदी (२०) रा, पटेल मोहल्ला रोहिणी जिल्हा बऱ्हाणपूर (मध्य प्रदेश), नहार सिंग पिता वेस्ता (३४) पंचायत मोहनपुरा, तहसील भगवानपुरा, जिल्हा खरगोन (मध्यप्रदेश) अशा २ आरोपर्यांना सोमवार दि. २७ जुलै २०२६ रोजी दुपारी ४.३८ वाजे दरम्यान अटक केली आहे.

## खरेदी विक्रीसाठी आधार कार्ड बंधनकारक

### नव्या प्रस्तावाला मिळणार मान्यता



#### मालमत्तेच्या रजिस्ट्रीसाठी आधार कार्ड बंधनकारक

» नवीन नियमानुसार, कोणतीही नोंदणी करताना आधार जोडणे अनिवार्य असणार आहे. यामुळे व्यवहार करणा व्यक्ती अधिकृत आहे की नाही, याची खात्री करणे निबंधक कार्यालयाला सोपे जाणार आहे.

#### बनावट आधार जोडणीने गैरप्रकार वाढले

» यापूर्वी दस्त नोंदविताना बनावट किंवा अपूर्ण कागदपत्रे जोडून फसवणूक करण्याचे अनेक प्रकार समोर आले होते. बनावट आधार कार्डचा गैरवापर करून होणाऱ्या या गैरप्रकारांना आता या नवीन नियमावलीमुळे चाप बसणार आहे.

प्रतिनिधी २९ जुलै

**अकोला:** राज्यात जमीन जुमला तसेच मालमत्ता खरेदी विक्री करण्यासाठी अनेकांची फसवणूक झाल्याचे प्रकार समोर आले आहेत. मृत व्यक्तीच्या नावावर बोगस व्यक्तींना उभे करून मालमत्तेचे व्यवहार पार पडले आहेत.

त्यामुळे सरकार अशा व्यवहारांवर अंकुश ठेवण्यासाठी जमीन, घर, सदनिका किंवा इतर कोणत्याही मालमत्तेची खरेदी-विक्री करताना आता दस्तनोंदणीसोबत आधार कार्ड जोडणे बंधनकारक करणार आहे. यासंदर्भातील नव्या प्रस्तावाला मान्यता मिळाल्यानंतर नोंदणी प्रक्रियेत होणाऱ्या गैरप्रकारांना आणि फसवणुकीला मोठा आळा बसणार आहे.

सध्या दस्तनोंदणी करताना इतर ओळखपत्रांचा वापर केला जात नात असल्यामुळे काही वेळा बनावट कागदपत्रे सादर करून किंवा दुसऱ्याच व्यक्तीला उभे करून जमिनी व फ्लॅट हडप करण्याचे गैरप्रकार समोर येत होते. मात्र, आता आधार कार्ड बंधनकारक झाल्यामुळे आणि त्याच्या बायोमेट्रिक पडताळणीमुळे (ऑथेंटिकेशन) व्यक्तीची अचूक ओळख पटवणे शक्य होईल.

सर्वसामान्यांच्या मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी आणि महसूल व नोंदणी विभागाचे कामकाज अधिक सुरक्षित व पारदर्शक करण्यासाठी हे पाऊल अत्यंत महत्त्वाचे ठरेल.




## गुरुपौर्णिमेनिमित्त संत नगरीमध्ये गण गण गणात बोतेचा जयघोष..!

प्रतिनिधी २९ जुलै

**शेगाव:** गुरुपौर्णिमेनिमित्त विदर्भाचा प्रति पंढरपूर म्हणून ओळख असलेल्या संतनगरी शेगावात देखील राज्याच्या कानाकोपऱ्यातून भाविक दाखल होत आपली सेवा श्रींच्या चरणी अर्पण करतात. गुरु पौर्णिमेनिमित्त वीज वितरण कंपनीचे स्वतंत्र संचालक व भाजप प्रवक्ते विश्वासराव पाठक यांनी गजानन महाराजांचा दर्शन घेत गजानन महाराज संस्थान च्या स्वच्छता आणि कारभाराबद्दल आमच्या प्रतिनिधीशी चर्चा केली.

मागील 19 वर्षापासून मलकापूर ते शेगाव अशा जवळपास 70 किलोमीटरचा पायी प्रवास करत श्री संत गजानन महाराज सेवा ट्रस्ट मलकापूरची दिंडी शेगावी दाखल होत आपली सेवा देत असते. यामध्ये महिला व पुरुष असे जवळपास 900 ते 1000 वारकरी सहभाग घेत . गण गण गणात बोतेचा जयघोष करीत संत नगरीत पोहचले.

## हेल्मेटची सक्ती नव्हे, जीव वाचवण्याची गरज

प्रतिनिधी २९ जुलै

**अकोला:** शहरात हेल्मेट सक्तीबाबत जनजागृती सुरू असताना, हेल्मेट हे केवळ दंड टाळण्यासाठी नव्हे तर स्वतःचा जीव वाचवण्यासाठी किती महत्त्वाचे आहे, याची जाणीव प्रत्येक दुचाकीस्वाराने ठेवणे गरजेचे आहे. अपघात कोणालाही, कधीही होऊ शकतो. त्यामुळे प्रत्येक प्रवासात हेल्मेटचा वापर करणे ही काळाची गरज बनली आहे.

रस्त्यावर वाहन चालवताना अपघाताची पूर्वकल्पना कोणालाही देता येत नाही. अनेकदा छोटासा अपघातही डोक्याला गंभीर दुखापत होऊन जीवावर बेततो. अशा वेळी एक दर्जेदार हेल्मेट मृत्यू आणि जीवन यामधील महत्त्वाचा फरक ठरू शकते.वाहतूक पोलिसांकडून हेल्मेटची सक्ती केली जाते, ती केवळ नियमांची अंमलबजावणी करण्यासाठी नाही, तर नागरिकांचा अमूल्य जीव सुरक्षित राहावा या उद्देशाने आहे. अनेक दुचाकीस्वार दंड टाळण्यासाठी हेल्मेट घालतात, तर काहीजण अजूनही त्याकडे दुर्लक्ष करतात. मात्र अपघाताच्या क्षणी हेल्मेटच सर्वात मोठे संरक्षण देत असल्याचे अनेक घटनांमधून सिद्ध झाले आहे.हेल्मेट घालणे म्हणजे फक्त स्वतःची नव्हे, तर आपल्या कुटुंबाच्या सुरक्षिततेची जबाबदारी स्वीकारणे होय. आपण सुरक्षित घरी परतणे ही आपल्या कुटुंबासाठी सर्वात मोठी आनंदाची बाब असते. त्यामुळे प्रत्येक दुचाकीस्वाराने दर्जेदार हेल्मेट वापरावे, त्याचा पट्टा व्यवस्थित लावावा आणि वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करावे.



# महाराष्ट्राची न्यायव्यवस्था बळकट; राज्यातील 5 जिल्ह्यांमध्ये नवीन न्यायालयांना मंजुरी

प्रतिनिधी २९ जुलै

**मुंबई** : फडणवीस सरकारने राज्यातील नागरिकांना जलद आणि सुलभतेने न्याय देण्यासाठी एक मोठा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत, राज्याच्या विविध भागांमध्ये नवीन न्यायालये स्थापन करण्यासाठी कोट्यवधी रुपयांच्या निधीला मंजुरी देण्यात आली आहे. या निर्णयामुळे पुणे, अहिल्यानगर, सोलापूरसह अनेक जिल्ह्यांतील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

मंगळवारी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत, राज्याच्या विविध भागांमध्ये नवीन न्यायालये स्थापन करण्यासाठी कोट्यवधी रुपयांच्या निधीला मंजुरी देण्यात आली. या निर्णयामुळे पुणे, अहिल्यानगर, सोलापूरसह अनेक जिल्ह्यांतील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.



पुण्यत अमली पदार्थ प्रकरणांसाठी विशेष न्यायालय अमली पदार्थ आणि मादक पदार्थांशी (नार्कोटिक ड्रग्स अँड सायकोट्रॉपिक सबस्टन्सेस ॲक्ट, १९८५) संबंधित प्रकरणांच्या जलद सुनावणीसाठी पुण्यात एक स्वतंत्र विशेष न्यायालय स्थापन केले जाईल. सध्या, एनडीपीएस कायद्यानुसार राज्यात सुमारे ३० हजार प्रकरणे प्रलंबित असून १४२५ प्रकरणे प्रलंबित आहेत. किंवा, वाढत्या प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी उच्च न्यायालयाने पुण्यात विशेष न्यायालयाची शिफारस केली होती. किंवा, या न्यायालयासाठी ८ नवीन पदे आणि १ कोटी २६ लाख ३५ हजार रुपयांच्या खर्चाला मंजुरी देण्यात आली आहे. हे न्यायालय पुणे जिल्हा न्यायालयाच्या खोली क्रमांक २२ मध्ये सुरू केले जाईल.

कर्जतमध्ये जिल्हा आणि अतिरिक्त सत्र न्यायालय कर्जत आणि जामखेड किंवा अहिल्यानगर जिल्ह्यातील दोन्ही तालुक्यांतील नागरिकांना न्यायालयीन कामासाठी लामछा येथे जावे लागणार नाही. कर्जतमध्ये नवीन जिल्हा आणि अतिरिक्त सत्र न्यायालय स्थापन करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला आहे.

न्यायालयासाठी न्यायिक अधिकाऱ्यांसह २२ नियमित पदे मंजूर करण्यात आली असून, त्यासाठी ३ कोटी ३० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला जाईल. यामुळे दोन्ही तालुक्यांतील नागरिकांचा वेळ, पैसा आणि श्रम वाया जात आहेत.

कुर्डुवाडीत दिवाणी आणि प्रथम श्रेणी न्यायालय सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यात कुर्डुवाडी आणि परिसरातील नागरिकांच्या सोयीसाठी तेथे दिवाणी न्यायालय (कनिष्ठ स्तर) आणि प्रथम श्रेणी दंडाधिकारी न्यायालय सुरू केले जाईल. नवीन न्यायालयासाठी १२ पदे मंजूर करण्यात आली असून, त्यासाठी १ कोटी १८ लाख ७४ हजार रुपये खर्च केले जातील. दिवाणी आणि फौजदारी खटले स्थानिक पातळीवर चालवले जाणार असल्याने नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

५ जिल्ह्यांमध्ये अत्याचारांविरोधात विशेष न्यायालये अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम (१९८९) नुसार, दाखल झालेल्या खटल्यांच्या त्वरित सुनावणीसाठी राज्यातील ५ जिल्ह्यांमध्ये विशेष न्यायालये स्थापन करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

ही न्यायालये केवळ अहिल्यानगर, परभणी, सोलापूर, नांदेड आणि यवतमाळ या ५ जिल्ह्यांमध्येच कार्यरत राहतील.

## मुलुंड डम्पिंग ग्राऊंड भाडेतत्वावर देण्यास विरोध



प्रतिनिधी २९ जुलै

**मुंबई** : धारावी पुनर्विकास प्रकल्पाअंतर्गत एका मोठ्या जागेची आवश्यकता असल्याने ही जागा नवभारत मेगा डेव्हलरपर्स प्रा . लिमिटेडला ५ वर्षाच्या भाडेतत्वावर देण्यात येणार आहे . सुधार समितीच्या बैठकीत या प्रस्तावाला विरोध करण्यात आला.

मुलुंड डम्पिंग ग्राऊंवरील १५ एकर जागा धारावी पुनर्विकास प्रकल्पांतर्गत विशेष हेतू कंपनीला असलेल्या नवभारत मेगा डेव्हलपर्स प्रा. लिमिटेडला (अदानी कंपनी) पाच वर्षांसाठी भाडेतत्त्वावर देण्यात येणार आहे. ही जागा देण्यास मंगळवारी झालेल्या सुधार समितीच्या बैठकीत काँग्रेस, शिवसेना उबाठाने विरोध केला. मुंबईकरांच्या हक्काच्या जमिनी खासगी विकासक, कंपन्यांना देणे योग्य नसल्याचे सांगत त्याला तीव्र विरोध केला. त्यामुळे हा प्रस्ताव सुधार समिती अध्यक्ष संध्या दोशी यांनी राखून ठेवला.

मुलुंड डम्पिंग ग्राऊंवरील १५ एकर जागेवर धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठीच्या कास्टिंग यार्डसह अन्य कामासाठी या जागेचा वापर होणार आहे. मंगळवारी सुधार समितीच्या बैठकीत यावर चर्चा झाली. शिवसेना उबाठा पक्षाचे नगरसेवक सचिन पडवळ यांनी या प्रस्तावाला विरोध असल्याचे सांगितले. भाडेतत्त्वावर जागा देताना त्याची १८१ कोटी रुपये असलेली किंमत कमी करून ९८ कोटी करण्यात आली.

हक्काच्या जमिनी खासगी विकासक, कंपन्यांना देणे योग्य नाही


ही किंमत कोणत्या धोरणानुसार ठरवण्यात आली, अशीही विचारणा केली. तर काँग्रेसचे गटनेते अशरफ आजमी यांनी, मुंबईकरांच्या हक्काच्या जमिनी खासगी विकासक, कंपन्यांना देणे योग्य नसल्याचे स्पष्ट केले. धारावी पुनर्विकास प्रकल्पांतर्गत मुंबई महापालिकेने आतापर्यंत किती जागा दिल्या याची माहिती समितीने द्यावी, अशी मागणी करत या प्रस्तावाला विरोध केला. मुलुंड डम्पिंग ग्राऊंडवरील १५ एकर जागा ही भाडेतत्वावर देण्यास काही महत्त्वाची कारणे आहेत. . स्वतःची जमीन खरेदी न करता पालिकेच्या जागांचा वापर करण्यावर विरोधी पक्षांनी आक्षेप घेतला आहे . या प्रकल्पासाठी लागण्यात येणाऱ्या बांधकामाच्या साहित्य वाहतुकीसाठी येणाऱ्या गाड्याची येजा वाहतुकीची समस्या अधिक बिकट करणार आहे.

## लक्ष्मणराव जोशी यांच्या निधनाने व्रतस्थ संपादकाला मुकलो!

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची शोकसंवेदना

प्रतिनिधी २९ जुलै

**मुंबई** : नागपूर ‘तरुण भारत’चे माजी मुख्य संपादक ल. त्र्यं. उपाख्य लक्ष्मणराव जोशी यांच्या निधनाने पत्रकारितेतील एक मोठे चिंतनशील, व्रतस्थ व्यक्तिमत्त्व, विविध विषयांचे गाढे अभ्यासक आपल्यातून हरपले आहेत, अशी शोकसंवेदना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली आहे.



राजकारण, सिंचन अनुशेष हे त्यांच्या आवडीचे विषय होते. पत्रकार म्हणून एखादा प्रकल्प दत्तक घेत त्यावर सातत्याने लिखाण करण्याची परंपरा त्यांनी सुरु केली. गोसिखुर्द प्रकल्पावर त्यांनी विपुल लेखन त्याच परंपरेत केले होते. तरुण भारतात त्यांची प्रदीर्घ कारकिर्द झाली आणि तेथूनच ते निवृत्त झाले. पण, त्यानंतरही गोवा आणि इतर ठिकाणी विविध वृत्तपत्रात त्यांनी संपादक म्हणून आपली कारकिर्द गाजवली. त्यानंतरही समाजमाध्यमांवर सातत्याने त्यांनी आपली लेखणी जिवंत ठेवली. संपादकपदावर असतानाही हाडाचा पत्रकार कशाला म्हणतात, त्याचे ते मूर्तिमंत होते. माझ्या वडिलांच्या काळापासून त्यांचा परिचय होता. त्यामुळे सातत्याने त्यांचे मार्गदर्शन असायचे. एक अभ्यासू आणि पितृतुल्य व्यक्तिमत्त्व त्यांच्या निधनाने मी गमावले आहे. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात मी सहभागी आहे, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

## दादर गुन्हे शाखेची धडक कारवाई
## चोरीचा 6.90 लाखांचा सोन्याचा ऐवज हस्तगत



राजेश जायस्वाल २८ जुलै

**मुंबई** : लोहमार्ग पोलीस आयुक्तालयाच्या दादर गुन्हे शाखेने सराईत गुन्हेगाराला अटक करून दागिने चोरीच्या गुन्ह्याचा यशस्वी उलगडा केला आहे. या कारवाईत आरोपीकडून सुमारे ६.९० लाख किमतीची सोन्याची लगड हस्तगत करण्यात आली असून, चोरीचा ऐवज जप्त करण्यात पोलिसांना यश आले आहे.

दागिने चोरीच्या गुन्ह्याचा तपास सुरू असताना दादर गुन्हे शाखेच्या पथकाने तांत्रिक माहिती, गुप्त बातमीदारांचे जाळे आणि विविध पुराव्यांच्या आधारे आरोपीचा माग काढला. त्यानंतर सापळा रचून सराईत गुन्हेगाराला अटक करण्यात आली.

चौकशीदरम्यान, आरोपीने दागिने चोरीची कबुली दिल्यानंतर त्याच्याकडून चोरीतील सोन्याचे दागिने वितळवून तयार करण्यात आलेली ६.९० लाख किमतीची सोन्याची लगड जप्त करण्यात आली. या कारवाईमुळे संबंधित दागिने चोरीच्या गुन्ह्याचा उलगडा झाला असून, आरोपीचा इतर गुन्ह्यांतील सहभागही तपासला जात आहे. दादर गुन्हे शाखेच्या या कारवाईमुळे दागिने चोरी करणाऱ्या गुन्हेगारांवर प्रभावी अंकुश बसण्यास मदत होणार असून, पुढील तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

## सत्ताधारी-विरोधकांच्या दिमतीला महागड्या कार

### मुंबई महापालिकेचा प्रस्ताव लवकरच आयुक्तांकडे

**मुंबई** : सध्या सभागृह नेते, विरोधी पक्षनेते आणि उपमहापौरांकडे स्कॉरपिओ गाड्या असून त्यांच्याकडून तब्बल २५ लाखांच्या इनोव्हा क्रिस्टा गाड्यांची मागणी करण्यात आली आहे.

मुंबई महापालिकेतील पदाधिकाऱ्यांच्या सेवेसाठी आणखी महागड्या गाड्या घेण्याचा प्रस्ताव प्रशासनाकडून तयार केला जात आहे. सभागृह नेते, विरोधी पक्षनेते, उपमहापौर आणि तीन वैधानिक समित्यांच्या अध्यक्षांसह विरोधी पक्षनेत्यासाठीही नव्या इनोव्हा क्रिस्टा गाड्या घेण्याची मागणी करण्यात आली आहे. हा प्रस्ताव लवकरच महापालिका आयुक्त अश्विनी भिडे यांच्याकडे मंजुरीसाठी पाठवला जाणार आहे.



सत्ताधारी-विरोधकांच्या दिमतीला महागड्या कार महापौरांसाठी ३० लाखांची गाडी महापालिकेत निवडणुकीनंतर नगरसेवक, कार्यकर्ते आणि नागरिकांची वर्दळ वाढली आहे. विविध समित्यांच्या अध्यक्षांची नियुक्ती झाल्यानंतर महापौर, उपमहापौर आणि इतर पदाधिकाऱ्यांसाठी वाहने उपलब्ध करून देण्यात आली. महापौर रितू तावडे यांच्या सेवेसाठी सुमारे ३० ते ३५ लाख रुपयांची इनोव्हा हायक्रॉस हायब्रीड गाडी देण्यात आली आहे. उपमहापौर, सभागृह नेते, विरोधी पक्षनेते तसेच विविध समिती अध्यक्षांसाठी स्कॉर्पिओ एन वाहने देण्यात आली आहेत. मात्र, स्कॉर्पिओ एन वाहन प्रवासासाठी सोयीचे नसल्याची तक्रार सभागृह नेते गणेश खणकर यांनी केली आहे. महापालिका मुख्यालय ते घर, तसेच पाहणी दौऱ्यांदरम्यान या वाहनातून प्रवास करताना धक्के बसतात. या वाहनाची उंची अधिक असल्याने पाठीचा त्रास वाढतो, असे कारण देत इनोव्हा क्रिस्टा गाड्या देण्याची मागणी त्यांनी महापालिका प्रशासनाकडे केली आहे. इनोव्हा क्रिस्टा गाड्यांची मागणी. सभागृह नेते, उपमहापौर, स्थायी समिती अध्यक्ष, सुधार समिती अध्यक्ष आणि शिक्षण समिती अध्यक्षांसाठीही इनोव्हा क्रिस्टा गाड्या देण्याची मागणी करण्यात आली आहे. विरोधी पक्षनेत्या किशोरी पेडणेकर यांच्यासाठीही अशाच प्रकारची गाडी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. एका इनोव्हा क्रिस्टा गाडीची किंमत सुमारे २५ लाख रुपये असल्याचे सांगितले जाते.

नव्या इनोव्हा क्रिस्टा गाड्या मंजूर झाल्यास सध्या या पदाधिकाऱ्यांच्या सेवेत असलेल्या स्कॉर्पिओ गाड्या वॉर्डांच्या सहायक आयुक्तांना देण्यात येणार आहेत. सहायक आयुक्तांकडील जुन्या स्कॉर्पिओ गाड्या कार्यकारी अभियंत्यांना देण्याची योजना आहे.

"माझ्यासह उपमहापौर आणि समिती अध्यक्षांना अनेक बैठका, भेटी आणि पाहणी दौरे करावे लागतात. काही पदाधिकारी लांब राहतात. सध्याच्या स्कॉर्पिओ वाहनातून प्रवास करताना शारीरिक त्रास होतो. त्यामुळे इनोव्हा गाड्यांची मागणी केली आहे. विरोधी पक्षनेत्यांनाही अशीच गाडी मिळावी, अशी मागणी केली आहे," अशी माहिती सभागृह नेते गणेश खणकर यांनी दिली आहे.

## म्हाडाच्या थकबाकीने ठेकेदार अडचणीत

**मुंबई** : मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ (म्हाडा) झोन-४ (एफ/उत्तर विभाग) येथे नोंदणीकृत ठेकेदार म्हणून कार्यरत असलेल्या 'आर्या इंटरप्राईजेसचे' मालक शशिकांत शिरसेकर यांनी गेल्या १५ महिन्यांपासून प्रलंबित असलेल्या बिलांच्या रकमा तातडीने अदा करण्याची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

शिरसेकर यांनी दिलेल्या निवेदनानुसार, त्यांनी बाजारातून ३ ते ४ टक्के व्याजदराने कर्ज काढून शासनाची कामे पूर्ण केली. मात्र, १५ महिन्यांपासून त्यांच्या एकाही बिलाची रक्कम अदा करण्यात आलेली नाही. शासनाकडून निधी उपलब्ध होत असतानाही काही अधिकाऱ्यांकडून 'निधी नाही' किंवा 'निधी आल्यावर पेमेंट करू' अशी कारणे देत देयके प्रलंबित ठेवली जात असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.



मुख्यमंत्र्यांकडे न्यायाची मागणी

या आर्थिक अडचणींमुळे कुटुंबाचा उदरनिर्वाह, मुलांचे शिक्षण,आई-वडिलांच्या उपचारांचा खर्च आणि घेतलेल्या कर्जावरील व्याज भरणे अत्यंत कठीण झाले आहे. बदलापूर येथे वास्तव्यास असूनही दरमहा वाढणाऱ्या आर्थिक भारामुळे मानसिक तणाव निर्माण झाला आहे. रात्री झोप लागत नाही, जेवणाची इच्छा होत नाही. कधी कधी आयुष्य संपवावे असेही वाटते.

## राज्य मंत्रिमंडळाचा मोठा निर्णय: 'ड्रग्स फ्री मुंबई' मॉडेल आता संपूर्ण महाराष्ट्रात राबवणार

प्रतिनिधी २९ जुलै

**मुंबई** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात संपूर्ण देशात अमली पदार्थांविरुद्ध एक मोठा लढा उभारण्यात आला आहे. याच लढ्याला महाराष्ट्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली अधिक बळ मिळत आहे. 'ड्रग्स फ्री मुंबई' अभियानाचे मॉडेल आता संपूर्ण राज्यात राबविण्यात येणार आहे. मुंबईसह राज्यातील सर्व शाळा आणि महाविद्यालयांमध्ये ‘नशामुक्ति मार्गदर्शन व समुपदेशन समिती’ची स्थापना होणार आहे. माझ्या निवेदनाची दखल घेत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतल्याबद्दल मी मुख्यमंत्र्यांचे मनःपूर्वक आभार मानतो, असे नशामुक्ति जनजागृती अभियानाच्या




उच्चस्तरीय समितीचे अध्यक्ष तथा कॅबिनेट मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी सांगितले.

या समित्यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये व्यसनांविषयी सातत्याने जनजागृती केली जाईल. विद्यार्थ्यांच्या वर्तनातील बदल वेळेत ओळखून त्यांना आवश्यक समुपदेशन उपलब्ध करून देणे, पालक व शिक्षकांमध्ये समन्वय साधणे तसेच गरज भासल्यास संबंधित तज्ज्ञांकडे मार्गदर्शनासाठी संदर्भित करण्याची जबाबदारीही या समित्यांवर असेल.

केंद्र शासनाने २०२९ पर्यंत देश अमली पदार्थमुक्त करण्याचे उद्दिष्ट निश्चित केले असून, त्यासाठी सर्व विभागांच्या समन्वयातून अमली पदार्थांविरोधात प्रतिबंधात्मक कारवाई आणि व्यापक जनजागृती करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने महाराष्ट्र शासनानेही राज्यात व्यसनमुक्तीची चळवळ अधिक प्रभावी करण्यासाठी विविध उपाययोजना सुरू केल्या आहेत.३० जुलै रोजी वरळी डोम येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'ड्रग्स फ्री मुंबई' अभियानाचा शुभारंभ होत आहे. हा केवळ उद्घाटनाचा कार्यक्रम नसून वर्षभर चालणारी जनचळवळ आहे. या अभियानामध्ये विद्यार्थी, शिक्षक, पालक, स्वयंसेवी संस्था, मानसोपचारतज्ज्ञ, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना तसेच समाजातील विविध घटकांचा सक्रिय सहभाग निश्चित करण्यात आला आहे. व्यसनमुक्त महाराष्ट्र घडविण्याच्या या लोकचळवळीत विद्यार्थी, पालक, शिक्षक, स्वयंसेवी संस्था तसेच सर्व नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन कॅबिनेट मंत्री लोढा यांनी केले आहे.

## एम.डी. अंमली पदार्थासह एक इसम गजाआड



**मुंबई** : अंमली पदार्थ विरोधी कक्ष, वरळी युनिटचे पथक मुंबई शहरातील अंमली पदार्थ खरेदी-विक्री करणारे, पुरवठा, साठा करणारे इसमांचा शोध घेत असताना पथकास कलानगर जक्शन, बांद्रा पुर्व, मुंबई या ठिकाणी एका इसमाच्च्या हालचाली संशयास्पद आढळुन आल्याने त्याला अटकाव करून त्याचेकडुन कि.अं.रू. ३५,५०,०००/- मुल्याचा १४२ ग्रॅम वजनाचा 'एम.डी.' हा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे. २८ रोजी कारवाई करण्यात आली. सदरची यशस्वी कामगिरी देवेन भारती, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, अनिल कुंभारे, पोलीस सह आयुक्त (गुन्हे), मा. श्री. कृष्णकांत उपाध्याय, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली श्रीमती पौर्णिमा चौगुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई, व सुधीर हिरडेकर, सहाय्यक पोलीस आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई अं.प.वि. कक्ष, वरळी युनिटचे प्रभारी पो. नि. संतोष साळुंखे यांचे नेतृत्वाखाली अमित घोगरे व पथक यांनी केली आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय ओम शिव साई सीएचएस, पहिला मजला, बीएमसी मार्केट, रनवाल व ओंकार ई-स्क्वेअर जवळ, सायन (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र – ४०००२२. येथे प्रकाशित केले. ♦ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ♦ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 26 /A 3072, RRC Helpline No. 8484842135